# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# येशूसाठी भयंकर अशी वेळ


लेखकः Edward Hughes

रेखाचित्रकारः Byron Unger; Lazarus

रूपान्तरकारः M. Maillot; Sarah S.

Alastair Paterson

अनुवादकः Rev. Shilas Gavit



निर्माताः Bible for Children
www.M1914.org



©2022 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.




जेंव्हा येशूचा बाप्तिस्मा झाला, तेंव्हा देव बोलला होता. त्याने म्हटले, "हा माझा प्रिय पुत्र आहे. याच्याविषयी मी संतुष्ट आहे." देवाचा पवित्र आत्मा येशूवर कबुतरासारखा उतरला.




या घटनेनंतर लगेच, पवित्र
आत्म्याने येशूला अरण्यांत नेले.
येशू अरण्यात एकटाच होता.
3


चाळीस दिवसपर्यंत येशूने उपास केला. याचा अर्थ
असा की त्याने चाळीस दिवसपर्यंत काही खाल्ले
नव्हते. त्याला फार भूक लागली होती.
4


पवित्र शास्त्र असे देखिल सांगते की
तेथे हिंस्त्र पशू देखिल होते.
5


तेथे येशूची परिक्षा पाहण्यास सैतान आला.
फार-फार वर्षांपूर्वी देवाची आज्ञा पाळू नये म्हणून
ऐदेने बागेत त्याने आदाम व हवा यांची परिक्षा
पाहिली होती. आता येशूची पारख होणार होती.
6


देवाचा पुत्र येशू, याची
देखिल सैतानाने परिक्षा
घेण्याचा प्रयत्न केला.
7


सैतान म्हणाला, "जर तु देवाचा पुत्र आहेस, तर ह्या
धोंड्यास भाकर हो असे सांग." त्याला माहित होते
की येशूला भूक लागली आहे. देवाचा पुत्र दगडाचे
रुपांतर भाकरीत करु शकतो हे त्याला माहित होते.
येशू सैतानाचे ऐकून त्याप्रमाणे करेल का?
8


नाही! येशूने सैतानाची आज्ञा पाळली नाही. त्याऐवजी त्याने पवित्र शास्त्रातून
म्हणजे देवाच्या वचनातून त्याला उत्तर दिले. येशूने म्हटले, "मनुष्य केवळ
भाकरीने जगेल असे नाही, तर देवाच्या मुखातून निघणाऱ्या
प्रत्येक वचनाने जगेल."
9
मग सैतानाने येशूला यरुशलेम या मोठ्या शहरातील पवित्र मंदिरात; जेथे लोक
देवाची भक्ति करतात तेथे नेले. सैतान आता पुढे काय करणार?
10
"जर तूं देवाचा पुत्र आहेस तर येथून खाली
उडी टाक," असे सैतान म्हणाला, "कारण
पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे की, तुझे
रक्षण करण्यास तो आपल्या दूतांस
तुझ्याविषयी आज्ञा देईल."
11
"नाही." येशूने म्हटले, "असे देखिल म्हटले आहे की,
तुझा देव परमेश्वर ह्याची परीक्षा पाहू नको."
12
सैतानाने पुन्हा एकदा प्रयत्न केला. तो येशूला शहराच्या
बाहेर एका उंच डोंगराच्या टोकावर घेऊन गेला.
13
जगातील सर्व राज्यांचे वैभव दाखवित सैतानाने
येशूला म्हटले, "जर तूं माझ्या पाया पडून माझी
भक्ति करशील तर मी हे सर्व तुला देईन."
14

येशूने म्हटले, "सैताना माझ्यापुढून निघून जा," कारण पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे की, "परमेश्वर तुझा देव ह्यालाच नमन कर व त्याचीच सेवा कर."



15

काही वेळासाठी सैतान
येशूला सोडून निघून गेला.
त्यानंतर काहीतरी अद्‌भुत
असे घडले. ज्याने
सैतानाच्या आज्ञा
पाळल्या नाही असा
देवाचा पुत्र येशू
याची सेवाचाकरी
करण्यासाठी
देवाने त्याचे
दुत पाठविले.



16

येशूसाठी भयंकर अशी वेळ

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मत्तय ४, लूक ४

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

17

# समाप्त

38 60

18

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी
येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16

19